# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे ६० नवीन मार्ग सुरु करण्यात येत असल्याबाबत

**(१) ९०८४ (०८-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे ६० नविन मार्ग सुरु करण्यासाठी रिजनल ट्रान्सपोर्ट ऑथॉरिटी, ठाणे यांचेकडून परवानगी मिळणेसाठी माहे जानेवारी, २०१४ मध्ये व तत्पुर्वी मागील १ वर्षापासून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) वसई - विरार महानगरपालिका हद्दीतील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन विभागातर्फे पाठविण्यात आलेल्या सदरहू प्रस्तावास विनाविलंब मंजूरी मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१७) :** (१) होय, तथापि सदर प्रस्तावातील मार्ग हे मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्राबाहेरील व राज्याबाहेरील देखील आहेत.

(२), (३) व (४) मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व महानगरपालिका परिवहन उपक्रमांना मुंबई महानगर क्षेत्रात सर्वत्र प्रवासी सेवा देण्यास मंजूरी देण्यात आली आहे. फक्त त्या सेवेची सुरूवात किंवा शेवट त्यांच्या स्वत:च्या हद्दीत असणे आवश्यक आहे. त्यानुसार परिवहन उपक्रमांनी संबंधीत प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून परवाने घ्यावेत, असा निर्णय मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने घेतलेला आहे. तसेच दि.०५ ऑगस्ट, २०१० च्या प्राधिकरणाच्या बैठकीत वसई-विरार महानगरपालिका व नालासोपारा-नवघर-माणिकपूर नगरपरिषद यांच्या संयुक्त परिवहन सेवेस फक्त शहरी क्षेत्रात प्रवासी वाहतूक करण्यासाठी ५० खाजगी बसेस भाडे करारावर घेण्यास व पुरवठादाराशी योग्य करार करून काही अटींचे अधीन

राहून परवानगी दिली आहे. तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका परिवहन उपक्रमास एकूण ४८ मार्गावर टप्पा वाहतूकीचे परवाने मंजूर केले आहेत. मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्राबाहेरील व राज्याबाहेरील मार्ग परवाने देण्याचे अधिकार मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणास नाहीत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यात मॅजीक, मॅक्सीमो, इको यासारख्या सहा आसनी रिक्षा चालकांना वाहतूक परवाना मिळण्याबाबत**

**(२) ९५०९ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यात मॅजीक, मॅक्सीमो, इको यासारख्या सहा असनी रिक्षा चालकांना वाहतूक परवाना नसल्याने उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रिक्षा चालकांनी वाहतूक परवाना व टप्पा वाहतुकीची परवानगी शासनाकडे मागितली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सहा आसनी रिक्षा चालकांना वाहतूक परवाना व टप्पा वाहतुकीची परवानगी मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली का करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२३-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 119 नुसार वाहनांचीकमीतकमी इंजीन क्षमता 980 सीसीअसणे आवश्यक होते.दि.04.01.2017 च्या अधिसूचनेन्वये सदर नियमात सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार तीन चाकी सहा आसनी रिक्षा परवानाधारक700 सीसीपेक्षा कमी इंजिनक्षमता नसणाऱ्या चार चाकी वाहनाच्या परवान्यात बदली करण्याचीतसेच तीन चाकी तीन आसनी रिक्षा परवानाधारक 600 सीसीपेक्षा कमी इंजिनक्षमता नसणाऱ्या चार चाकी वाहनाच्या परवान्यात बदली करण्याची उक्त नियमानुसार सुधारणा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील पेढी नदिवरील भातकुली गावातील टेकडीपुरा व नदीकाठावरील लोकांचे त्वरीत पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) २१४६४ (०५-०९-२०१५). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील पेढी नदीवरील भातकुली गावातील टेकडीपूरा तसेच इतर ठिकाणचे व नदीकाठावरील लोकांचे त्वरीत पुनर्वसन करण्यात यावे व नदीपात्राचे सरळीकरण, लेंडीनाल्याचे खोलीकरण  पुरसंरक्षण भिंतींचे बांधकाम करणे अतिआवश्यक आहे व दरवर्षीच्या पेढी नदीला आलेल्या पूराचे पाणी घरात शिरुन आर्थिक नुकसान होते व पुढेही जिवहानी होऊ शकते यासाठी शासनाने वरील उपाययोजना करण्यासाठी स्थानिक महिलांनी आक्रमक होऊन भातकुली तहसिलदारा मार्फत अमरावती जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तातडीची उपाययोजना म्हणून पेढी नदी पात्राचे खोलीकरण, सरळीकरण व लेंडीनाल्याचे इंदिरा आवास परिसरामध्ये खोलीकरण व पुरसंरक्षण भितीचे अर्धवट बांधकाम पूर्ण करुन देणे तसेच इत्यादी कामे करण्यासाठी शासन निधी मंजूर करुन संबंधितास कामे तातडीने सुरु करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-११-२०१७) :** (१) होय.
(२) सदर चे काम मे. राजलक्ष्मी कस्ट्रक्शन अकलूज तर्फे  सुरु असून, खोलीकरणाचे काम ७० टक्के पुर्ण झाले आहे.उर्वरित काम सदर कंत्राटदाराकडून मुदतीत पूर्ण करून  घेण्यात येईल असे मुख्याधिकारी, नगर पंचायत, भातकुली यांनी कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर शहरातील खाजगी ट्रॅव्हल्सच्या संचालकांनी तिकीटाचे भाव तिप्पटीने वाढविल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(४) ५०९१९ (२८-०४-२०१६). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील खाजगी ट्रॅव्हल्सच्या संचालकांनी तिकीटाचे भाव तिप्पटीने वाढल्याविमुळे प्रवाशांची अंतोनात लुट होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या खाजगी ट्रॅव्हल्सच्या संचालकांनी उन्हाळ्याच्या सुटीत अचानक तिकिटांचे भाव तिप्पटीने वाढल्याविमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा खाजगी ट्रॅव्हल्सच्या संचालकांवर कडक कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२६-१०-२०१७) :**(१), (२) व (३) याबाबत राज्यातून व इतर राज्यातून मोठ्या प्रमाणात सुट्टीच्या दिवसामध्ये प्रवाशांची गैरसोय होवू नये याकरीता प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर यांनी विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांना प्रवाशांच्या सोयीसाठी शिवनेरी अथवा तत्सम स्वरुपाच्या जादा बसेसची व्यवस्था करण्याबाबत कळविले होते.

मा.मुंबई उच्च न्यायालयाने क्र. १४९/२०११ या जनहित याचिकेत दि.१६.०७.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार खाजगी प्रवासी बसेस यांचे भाडेदर निश्चितीचे सूत्र ठरविण्यासाठी C.I.R.T. पुणे या संस्थेची नियुक्ती करण्यात येवून या संस्थेद्वारे सादर केलेला अहवाल कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू-बोर्डी (ता.डहाणू, जि.पालघर) या प्रमुख राज्य मार्गावरील बस थांब्यांना शेड नसल्यामुळे नागरिकांना होत असलेला त्रास**

**(५) ६६८३१ (१६-१२-२०१६). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू-बोर्डी (ता.डहाणू, जि.पालघर) या प्रमुख राज्य मार्गावर डहाणू बस आगारामधून बसेस सुरु आहे मात्र मोजके थांबे वगळता हनुमानमंदिर, ठाकूरवाडी, नरपड, वडकतीपाडा, घोलवड, विजयवाडी, टोकेपाडा आदि बस थांब्यांना शेड नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गावरुन शाळेतील विद्यार्थी तसेच नोकरवर्ग शाळेत व व्यवसायासाठी जात असतात परंतु बस थांब्यावर शेड नसल्यामुळे सर्वांना त्रास सहन करावा लागत असल्यामुळे तेथील ग्रामस्थांनी बस थांब्यावर शेड उभारण्याबाबत सन २००९ पासून सतत डहाणू बस आगारात निवेदन देऊनही आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या प्रकरणी बस थांबे उभारण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.

नरपड व घोलवड या ठिकाणच्या थांब्यावर प्रवासी निवारा शेड आहे.

(२) व (३) रस्ता हद्दीमध्ये प्रवासी निवारा उभारण्यासाठी लोकप्रतिनिधी यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमातून निधी उपलब्ध करुन घेणेबाबतची कार्यवाही विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोले जिल्ह्यात शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने झालेले नुकसान

**(६) ६८३१७ (१६-१२-२०१६). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले जिल्ह्यात अतिवृष्टीने नुकसान झाल्याबाबत किसन सभेच्या वतीने राजूर येथे मोर्चा काढून तहसिलदार यांना नुकसानीची भरपाई देण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ०९.०१.२०१७ अन्वये, राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीतील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना पीक विमा योजनेच्या मंडळनिहाय नुकसान भरपाईच्या ५०% प्रमाणे रक्कम पीक विमा न घेतलेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील ग्रामीण व दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना बसचा मोफत पास व शिष्यवृत्ती मिळण्याबाबत

**(७) ६८४६६ (१६-१२-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील ग्रामीण व दुष्काळी भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना बसचा मोफत पास मिळावा, विद्यार्थ्यांची सन २०१५-१६ या वर्षातील शिष्यवृत्ती त्वरीत मिळावी आदिसह प्रमुख मागण्यासाठी सांगलीत विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या मागण्यासंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन बसेसमधून शाळा/महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांना शासनाकडून राज्य परिवहन प्रवासी भाडयात ६६.६७ टक्के सवलत देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे हटटा (ता.वसमत, जि.हिंगोली) येथे एस.टी. स्टँड बांधणेबाबत**

**(८) ६९२४० (१६-१२-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हटटा (ता.वसमत, जि.हिंगोली) येथे एस.टी.स्टँड बांधण्यासाठी एस.टी महामंडळाने ३ एकर जमीन खरेदी केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांची, प्रवाशांची सदर एस.टी. बस स्टँड बांधण्यासाठी मागील अनेक वर्षापासून सतत मागणी असूनही त्या दृष्टीने अद्याप काही ठोस कार्यवाही नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांची प्रवाशांच्या सोयीसाठी लवकरात लवकर एस.टी.स्टँड चे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) मौजे हट्टा येथे राज्य परिवहन स्टँड बांधण्याबाबत खर्चाची तरतूद करण्याची बाब विचाराधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील जमिनीच्या विक्रीस परवानगी मिळण्याबाबत**

**(९) ७२६२७ (२७-०१-२०१७). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा- राज्यातील पाटबंधारे प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या स्लबपात्र जमिनीच्या खरेदी-विक्री व्यवहारातील निर्बंध पुन्हा कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसनासाठी धरण प्रकल्पाचे पाणी मिळणाऱ्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर पुनर्वसनासाठी राखीव असे शेरे नोंदविले जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या ताब्यात आलेल्या जमिनीवर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाले आहे अशा धरणाच्या लाभक्षेत्रातील जमिनी विक्रीस परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-११-२०१७) :** (१) व (२) होय.
(३) पुणे जिल्हयातील पाटबंधारे प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले नसल्याने, प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्ह्यात कपाशीला व केळीला भाव मिळण्याकरिता काढलेला मोर्चा**

**(१०) ७६८६२ (१४-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यात कपाशीला दहा हजार रुपये तर केळीला १५०० रुपये (क्विंटलला) भाव मिळणेबाबत एका राजकीय पक्षामार्फत जिल्हाधिकारी कार्यालयावर माहे ऑक्टोबर २०१६ च्या पहिल्या सप्ताहात मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागण्याचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१३-११-२०१७) :** (१) होय.
(२) सदर निवेदनातील मुख्य मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१. अतिवृष्टीमूळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन त्वरीत नुकसान भरपाई मिळावी.

२. कापसाला रु १०,०००/- प्रति क्विंटल व केळी उत्पादक शेतक-यांना रु १५००/- प्रति क्विंटल एवढा हमीभाव मिळावा.

३. केळी पिक विम्याच्या रकमा तात्काळ मिळाव्यात.

४. केळी पिकासाठी कायमस्वरुपी उपाययोजना कराव्यात. यासाठी ठोस धोरण ठरविण्यात यावे.

५. शेतक-यांच्या कर्जाचे पुर्नगठन करण्यात यावे.

(३) शेतमालाच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करणे ही पूर्णपणे केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब असून, शेतमालास वाजवी भाव मिळावेत म्हणून राज्य शासन नेहमीच केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घेत असते.

विक्री हंगाम २०१६-१७ करिता केंद्र शासनाने कापूस (लांब धागा) या पिकासाठी रु. ४१६०/- इतकी किमान आधारभूत किंमत जाहिर केलेली आहे. केळी पिकासाठी केंद्र शासन किमान आधारभूत किंमत जाहिर करत नाही.

पुनर्रचित हवामान आधारित पिक विमा योजने अंतर्गत आंबिया बहरात केळी पिकासाठी सन २०१५-१६ मध्ये जळगाव जिल्ह्यातील ३६,३१० शेतक-यांनी पीक विमा योजनेत सहभाग घेतला, त्यांना रु.३५१.९३ कोटीचे विमा संरक्षण देण्यात आले, हवामान धोके लागू झालेल्या

महसूल मंडळातील ३४,५०९ शेतक-यांना रु.३५.१८ कोटी नूकसान भरपाई अदा करण्यात आली. सन २०१६-१७ मध्ये जळगाव जिल्ह्यातील ४३,८१५ शेतक-यांनी केळी पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून, त्यांना रु.४५३.९५ कोटी रक्कमेचे विमा संरक्षण देण्यात आलेले आहे.

सन २०१५-१६ मध्ये खरीप व रब्बी हंगामात कर्ज घेतलेल्या राज्यातील ७,२७,०१४ शेतकऱ्यांकडील रु.५३५०.४७ कोटी पीक कर्जाचे ५ वर्ष मुदतीच्या मध्यम मुदत पीक कर्जामध्ये रुपांतर करण्यात आलेले आहे.

सन २०१६-१७ च्या हंगामात राज्यात टंचाई सदृश्य परिस्थिती नसल्यामूळे शासनाने ५० पैसे पेक्षा कमी पैसेवारीची गावे जाहीर केलेली नसल्याने राज्यातील बँकांकडून पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रुपांतराचे व्यवहार झालेले नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयात अनुदानाच्या वाटपात गत दोन वर्षापासून करण्यात आलेला दुजाभाव**

**(११) ७७३७७ (१४-०४-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात रोजगार हमी योजनेतील फळबाग लागवडीसाठी प्राप्त अनुदानाच्या वाटपात गत दोन वर्षापासून दुजाभाव करण्यात येत असून काही तालुक्यांना झुकते माप देऊन बाकी तालुक्यांवर अन्याय करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनुदान वाटपाबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकाऱ्यांमध्येच समन्वय नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे तक्रारही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१३-११-२०१७) :** (१), (२) व (३) खरे नाही.

सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये मागणीपेक्षा कमी निधी उपलब्ध झाला. उपलब्ध निधी व तालुका कृषि अधिकारी यांनी केलेली निधीची मागणी विचारात घेवून अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांनी याबाबत तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे तक्रार केलेली दिसून आलेली नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील वडाळा व ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयातील ऑनलाईन प्रणालीतील दोष दूर करण्यास होत असलेला विलंब**

**(१२) ८४४५१ (१३-०४-२०१७). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा व ताडदेव प्रादेशिक परिवहन कार्यालयात सुरु केलेल्या वाहन-४ या ऑनलाईन प्रणालीत दोष असल्याने ही प्रणाली विकसित करणा-या केंद्र सरकारच्या नॅशनल इन्फॉर्मेशन सेंटर (एनआयसी) च्या कार्यपध्दतीवर येथील अधिका-यांमध्ये नाराजी व्यक्त होत असल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रणालीतील त्रुटी दूर करण्यासाठी एनआयसी ने विशेष टीम पाठवण्याचे आश्वासित करुन देखील अद्याप पाठविण्यात आले नसल्यामुळे वाहनधारकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (३०-११-२०१७) :**(१) हे खरे नाही.

दि.२८.०१.२०१७ रोजी वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.

(२) हे खरे नाही.

ज्या प्रकरणामध्ये तांत्रिक त्रुटी निर्माण झाल्या अशा सर्व प्रकरणाचे राष्ट्रीय सूचना केंद्र यांच्या सहाय्याने त्रुटींचे तात्काळ निरसन करण्यात आले आहे. सारथी व वाहन संगणक प्रणालीचे यशस्वी अंमलबजावणी करण्याकरीता राष्ट्रीय सूचना केंद्र यांच्यामार्फत आवश्यक ती मदत घेण्यात आली असून त्यासाठी ४० सपोर्ट प्रोग्रामरची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ५९० तलावांचे वाटप धोरण तयार करण्याबाबत**

**(१३) ८५०६६ (१५-०८-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५९० तलावांचे गेल्या दोन वर्षापासुन मासेमारी करीता वाटप रखडल्याने १ लाख १० हजार मासेमारांवर उपासमारीची पाळी ओढवली असल्याबाबतची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मासेमारी संदर्भात राज्य शासनाने दिनांक ३० जून, २०१७ पुर्वी धोरण निश्चित करावे असे आदेश मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासनाला दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देषानुसार राज्य शासनाने मासेमारी करीता तलावांचे वाटप धोरण तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१६-११-२०१७) :**(१) मत्स्यव्यवसायासाठी तलाव ठेक्याने देण्याबाबत दि. २६.०६.२०१४ रोजीच्या शासन निर्णयास दि. १६.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये स्थगिती देण्यात आली होती. परंतू सदर स्थगिती कालावधी दरम्यान मच्छिमारांना रू. ५००/- प्रति महिना प्रमाणे मासेमारी परवाने देण्यात आले होते.

(२) मत्स्यव्यवसायाकरिता जलाशय / तलाव ठेक्याने देण्याबाबत राज्य शासनाने दि.३०.०६.२०१७ पुर्वी धोरण निश्चित करण्याचे निर्देश मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी राज्य शासनास दिले होते, ही बाब खरी आहे.

(३) मत्स्यव्यवसायाकरिता जलाशय / तलाव ठेक्याने देण्यासाठी सुधारित धोरण शासन निर्णय दि. ३०.०६.२०१७ अन्वये जाहीर केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कृषी विभागातील पदे तातडीने भरण्याबाबत**

**(१४) ८५५५३ (१५-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील चार मंडळ कार्यालये असून कृषी अधिकाऱ्यांसह अन्य पदे रिक्त असल्याचे असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागातील अनेक रिक्त पदांमुळे कृषी विभागाच्या कामाचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन मिळवणे अवघड झाले आहे हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कृषी विभागातील पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१८-११-२०१७) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील तीन मंडळ कार्यालये असून तालुका कृषि अधिकारी कार्यालय शाहुवाडी व अधिनस्त कार्यालयामध्ये ६७ मंजूर पदापैकी ३८ पदे भरलेली असून २९ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

रिक्त पदांचा अतिरिक्त पदभार नजीकच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकडे देवून कृषि विभागाच्या विविध योजनांची अंमलबजावणी सुरु असून शेतकऱ्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(३) विभागीय कृषि सहसंचालक, कोल्हापूर हे रिक्त पद दिनांक १९/०८/२०१७ रोजीच्या आदेशान्वये भरण्यात आले आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील ५० उमेदवारांची निवडयादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त झालेली असून त्यांना नियुक्ती

देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच आणखी ७९ रिक्त पदांचे मागणीपत्र दिनांक ३०/०३/२०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे.

तसेच या संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील १०२ रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही चालू आहे.

क्षेत्रिय स्तरावरील कृषि सहाय्यक संवर्गाची ७३० पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यामध्ये आहे. उर्वरीत रिक्त पदे १००% भरण्यास मान्यता मिळालेली असून त्यानूसार तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क संवर्गातील इतर रिक्त पदे नियमातील तरतुदीनूसार तातडीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे मेट्रोसाठी खासगी तसेच शासकीय जागा देण्यास आस्थापनांनी केलेला विरोध**

**(१५) ८५५८८ (१५-०८-२०१७). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे मेट्रोसाठी खासगी, शासकीय जागा देण्यास आस्थापनांनी विरोध केल्याने प्रत्यक्ष कामास विलंब होत असल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सर्वात मोठा विरोध कृषी महाविद्‌यालयाचे कर्मचाऱ्यांपासून ते विद्‌यार्थी आंदोलनाची तयारी करत असल्याने पुणे मेट्रोला अडथळा येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी महाविद्‌यालयाच्या सुमारे ३० एकर जागेवर मेट्रो प्रकल्पाचा डेपो उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आला असल्याने ही जागा संपादीत केल्यास कृषी शिक्षणाच्या मॉडेलचा धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कृषी महाविद्‌यालयाची जागा संपादीत करण्यात येऊ नये, अशी मागणी कृषी महाविद्‌यालयाच्या आजी-माजी विद्‌यार्थ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१६-११-२०१७) :** (१), (२) व (३) नाही.

(४) तथापि, पुणे मेट्रोसाठी कृषि महाविद्यालयाची जागा देताना कृषि महाविद्यालयासाठी सिंचन विहीर, पम्पिंग सिस्टिम नवीन जागी बांधून देणे व मातृवृक्षाचे नवीन जागी प्रत्यारोपण पुणे मेट्रोने स्वखर्चाने करण्याबाबतचा निर्णय दि.१५.०७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार झाला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आचरा (जि.सिंधुदुर्ग) येथील मासळी मंडई वापरास खुली करण्याबाबत**

**(१६) ८५७३१ (१५-०८-२०१७). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आचरा (जि.सिंधुदुर्ग) मासळी मंडईचे काम गेल्या दोन वर्षापासून पूर्ण होऊनही अदयापी वापरासाठी खुले करण्यात आले नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मासळी मंडई मच्छी विक्रेत्यांकरिता खुली न केल्याने संतप्त झालेल्या महिला मच्छी विक्रेत्यांनी ग्रामपंचायतीस दिनांक २० मे,२०१७ रोजी वा त्या सुमारास घेराव घातला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मासळी मंडईचे काम पूर्ण होऊनही वापरासाठी खुले न करण्यामागची कारणे काय आहेत,

(४) तसेच मासळी मंडई तात्काळ खुली करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. महादेव जानकर (१३-११-२०१७) :** (१) खरे नाही.

(२) खरे नाही.

(३) मासळी मंडईचे काम अद्याप पुर्ण झाले नसून पाणी व्यवस्था, नाले/गटर इत्यादि कामे अपूर्ण आहेत.

(४) राष्ट्रीय मत्स्यिकी विकास मंडळाने मान्य केलेल्या रु.१४७.३६ लक्षच्या अनुदानापैकी रु.१२८.९३ लक्षची रक्कम महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळास प्राप्त झाली आहे. उर्वरित अनुदानाची रक्कम प्राप्त होण्यासाठी महामंडळामार्फत पाठपुरावा सुरु आहे. तसेच या प्रकरणी ग्राम पंचायत, आचरा यांना महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळामार्फत सदर मासळी मंडई खुली करण्याबाबत योग्य त्या सुचना देण्यात आल्या आहेत.

---

**राज्य मार्ग परिवहन महामंडळातून निवृत्त झालेल्या सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या मागण्याबाबत**

**(१७) ८६०३१ (१४-०८-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळातून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या संघटनेने सन २०१२ ते २०१६ या कालावधीमधील वाढीव उपदान, शिल्लक रजेचा पगार इ.देणी त्वरीत द्यावीत निवृत्ती कर्मचा-यांना पती/पत्नीस रूपये ५०० किंवा अधिक रक्कम घेवून वर्षभराचा साधी/हिरकणी गाडयातून प्रवास करण्याचा मोफत पास देण्यात यावा, रोजदार कालावधीचे उपदान विनाविलंब देण्यात यावे, कर्मचा-यांच्या देय रक्कम त्वरीत निवृत्ती होतेवेळीच देण्यात याव्यात, शिल्लक रजेच्या पगारासह मध्यवर्ती कार्यालय कर्मवर्ग परिपत्रक क्र.१३०२, दिनांक ८ एप्रिल, २००४ नुसार निवृत्ताच्या पाल्यांना ५ टक्के नोकरभरतीमध्ये आरक्षण देण्यात यावे, अन्यपेट रक्कम/बीपीटीझेड रक्कम मध्यवर्ती कार्यालय, मुंबई परिपत्रक क्र.गणना शाखा/४०३,

दिनांक ३० डिसेंबर, २००८ नुसार कर्मचा-यांच्या खात्यावर त्वरीत जमा करावी, राज्यपरिवहन महामंडळामध्ये अप शीप (शिकाऊ उमेदवारी) केलेल्या निवृत्तांच्या पाल्यांना त्वरीत नेमणूक द्यावी, कर्मचारी निवृत्त होताना त्यांच्या उपदानातून कोणतीही पूर्व सुचना न देता रक्कम कपात करू नये, निवृत्ताच्या अनिर्णयीत प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी संघटनेच्या पदाधिका-यांबरोबर दर ३ महिन्यांनी विभाग पातळीवर बैठका घेण्यात याव्यात, महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक से.ने.वि.२०२५,प्र.क्र.०१ सेवा-४, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ नुसार दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या, मृत पावलेल्या निवृत्तीधारक/कुंटूंब निवृत्ती वेतनधारकांचा मृत्यू झाल्यास नि:सेवा उपदानाची मर्यादा रूपये ७ हजार करण्यात आली आहे त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, दिनांक १ एप्रिल, २०१२ नंतर रा.प.सेवेतून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांनी एकाच पदावर २४ वर्षे सेवा केली आहे, अशा निवृत्तांना २०१२ ते २०१६ या कालावधीचा आर्थिक लाभ द्यावा (कामगार शाखा परिपत्रक क्र.८/२०१५, दिनांक ५ मार्च, २०१५ नुसार) आदी मागण्याचे निवेदन मागील २० वर्षापासून वारंवार शासनाला सादर केले असतानाही सदरहू मागण्याबाबत शासनाने आजमितीस कोणताही निर्णय घेतलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्य परिवहन महामंडळातून निवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या उपरोक्त मागण्या त्वरित पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) निवृत्त कर्मचारी/ सेवेत नसलेले कर्मचारी यांचे बँक खाते क्रमांकानुसार त्यांच्या खात्यात अनपेड रक्कम/बीपीटीझेड रक्कम जमा करण्यासाठी महामंडळाद्वारे सर्व विभागांना सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जाते. त्याचप्रमाणे महामंडळाच्या संकेतस्थळावर बीपीटीझेड-एफडब्ल्यूसी खात्यामधील रकमांच्या वेळोवेळी यादया प्रसिध्द करण्यात येतात.

शिकाऊ उमेदवारी केलेल्या निवृत्त कामगारांच्या पाल्यांना महामंडळात थेट नेमणूक देण्याची तरतूद नाही.

सध्या रा.प.महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांच्या पती/पत्नीस जूलै ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये दोन महिन्याच्या मुदतीचा मोफत पास देण्यात येत आहे. तसेच सेवेत असताना/सेवानिवृत्तीनंतर मरण पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या पत्नीस/पतीस जूलै ते फेब्रुवारी या कालावधीमध्ये एक महिन्याच्या मुदतीचा मोफत पास देण्यात येतो.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून प्रवास करणाऱ्या सवलत धारकांची वाढती संख्या लक्षात घेता यापुढे कोणतीही प्रवास भाडे सवलत अनुज्ञेय करावयाची झाल्यास गृह (परिवहन) विभागाच्या संमत्तीने मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करुन मान्यता घेऊनच जाहीर करावी असे निर्देश शासनाच्या दि.०२.०९.१९८६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

संघटनेच्या मागणीनुसार रु.५००/- भरुन १२ महिने मोफत पास देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाने दि.१०.०८.२००९ च्या ठरावांन्वये अमान्य केलेला आहे. तसेच सन २०१४ मध्ये वाहतूक खात्याकडून संचालक मंडळापुढे रु.५००/- भरुन मोफत पासाबाबत ठराव मांडण्यात आला होता. त्यावेळी संचालक मंडळाने सदरची बाब पुढे ढकललेली आहे.

राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत निवृत्त कर्मचारी अथवा त्यांचे संघटना प्रतिनिधी यांचेसमवेत महामंडळाद्वारे वेळोवेळी चर्चा करण्यात येत असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परिवहन विभागाने प्रसिध्दी केलेले रुग्णवाहिका दरपत्रक रुग्णालयाच्या आवारात लावण्याबाबत**

**(१८) ८६२०६ (१४-०८-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या परिवहन विभागाने प्रसिध्दी केलेले रुग्णवाहिका दरपत्रक रुग्णालयाच्या आवारात लावले जात नसल्यामुळे व रुग्णालयात रुग्णवाहिकाचे रजिस्टर योग्य प्रकारे मेंन्टन होत नसल्यामुळे रुग्णांना व मृताला घरी घेवून जात असताना नेमके किती भाडे द्यायचे हे स्पष्ट होत नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन शवागारा दाराजवळ परिवहन विभागाने प्रसिध्द केलेले दरपत्रक लावावे व दरपत्रकाप्रमाणे रजिस्टर नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-११-२०१७) :** (१) अशा आशयाची वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(२) जनहित याचिका क्र.१६/२०१३ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी रुग्णवाहिकांचे दर निश्चित केलेले आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दिनांक १२.०९.२०१३ च्या ठराव क्र.४७/२०१३ व दि.०१.०३.२०१४ रोजीच्या ठराव क्र.२/२०१४ अन्वये सदरचे भाडेपत्र सर्व रूग्णवाहीकांच्या आतील बाजूने प्रदर्शित करणे चालक व मालक या दोन्हींवर बंधनकारक आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर एस.टी आगारातील समस्यांचे निवारण करण्याबाबत**

**(१९) ८६२९३ (१४-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर एस.टी राज्यातील अत्यंत महत्वाचे व कर्नाटक राज्यास जोडणारे महत्वाचे एस.टी आगार असून दररोज हजारो प्रवासी ये-जा करत असतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर आगारात अनियमितपणा, नवीन बदली झालेल्या कर्मचा-यास खोली न मिळणे, तसेच कर्मचाऱ्यांसाठी असणारी संभाजीनगर आगारातील इमारत गेली पाच वर्षे रिकामी असणे, अशा अनेक समस्या निदर्शनास येत आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याचा परिणाम प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सेवेवर दिसून येत आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर आगारातील समस्यांचे निवारण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-११-२०१७) :** (१) होय.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या कोल्हापूर बसस्थानकातून बसफेऱ्या वेळेवर सुटतात, तसेच, संभाजीनगर आगारामध्ये केवळ आगार व्यवस्थापक निवासस्थान असून, संभाजीनगर आगारातील व विभागातील मुख्यालयातंर्गत येणाऱ्या आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी महामंडळातर्फे ताराबाई पार्क येथे निवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत. कर्मचाऱ्यांच्या मागणी अर्जानुसार प्रतिक्षायादी तयार केलेली असून, रिक्त होणाऱ्या सदनिकांचे वाटप प्रतिक्षायादीवरील कर्मचाऱ्यांना करण्यात येते. निवासस्थानांचे वाटप न झालेल्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार घरभाडे भत्ता देण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयामधील नवीन एस.टी. बसची संख्या वाढविणे व एस.टी. पिकअप शेडसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(२०) ८६४२२ (१४-०८-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामधील शहराच्या मध्यवर्ती बस वाहतूक स्थानकामधून दिवसाला १० ते २० हजार प्रवासी प्रवास करत असून देखील त्यांच्या सुरक्षेकरीता स्थानकात पोलीस चौकी असतानाही पोलीस अधिकारी उपलब्ध नसतात हे खरे आहे काय,

(२) असल्यास जिल्हयातील बहुतांशी आगारामध्ये एस.टी. बसेस नादुरूस्त असून नविन बसगाड्या उपलब्ध करण्याबाबत आगार प्रमुखांनी विभाग नियंत्रक यांचेकडे मागणी करूनही अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास नवीन एस.टी. बसची संख्या वाढविणे व जिल्ह्यातील एस.टी. पिकअप शेडसाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) कोल्हापूर बसस्थानकातील पोलीस चौकीमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी २ पोलीस कर्मचाऱ्यांची सकाळी ०९.०० ते रात्रौ २१.०० वाजेपर्यंत नेमणूक करण्यात आली आहे. तसेच, महिलांच्या सुरक्षेसाठी पोलीसांमार्फत स्थापन करण्यात आलेले दामिनी पथक व पोलीस बिटमार्शलमधील पोलीस कर्मचारी बसस्थानक व परिसरामध्ये दिवस-रात्र गस्त घालत आहेत.
(२) व (३) कोल्हापूर विभागाकडून ७९५ नियते चालविली जातात, त्याकरीता ८९३ वाहने उपलब्ध आहेत. महामंडळाद्वारे कोल्हापूर विभागात सन २०१५ ते २०१७ या कालावधीत १०७ नवीन बसेस देण्यात आलेल्या असून ११८ जुन्या बसेस मोडीत काढण्यात आलेल्या आहेत.

तसेच, प्रवाशांच्या सेवेसाठी आमदार/खासदार यांच्या निधीतून व स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत पिकअप शेड बांधण्यात येतात. सद्यस्थितीत कोल्हापूर विभागात २२८ पिकअपशेड बांधण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजस्थान धर्तीवर शेतकऱ्यांना विमा संरक्षण योजना राबविण्याबाबत**

**(२१) ८६६७९ (१५-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजस्थान सरकारने शेतकऱ्यांसाठी केवळ २७ रु. मध्ये ६ लाख रुपयांचे वैयक्तीक विमा संरक्षण योजना अंमलात आणलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यशासन या धर्तीवर शेतकऱ्यांसाठी वैयक्तीक विमा संरक्षण योजना राबविण्याबाबत विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना राबविण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनेची तरतुद शासनाने केलेली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-११-२०१७) :**(१), (२) व (३) शासनाच्या कृषि विभागामार्फत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत राज्यातील सर्व ७/१२ धारक शेतकऱ्यांचा विमा उतरविण्यात येतो. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून कोणताही विमा हप्ता घेतला जात नसून रु. २.०० लाखाचे विमा संरक्षण दिले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात उष्माघातने मृत्यु झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(२२) ८६८४४ (१५-०८-२०१७). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माह एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान उष्माघाताने ९ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर घटनेत मृत झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना नैसर्गिक आपत्ती दाखल मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) उष्माघातामुळे मुत्यू झालेल्या मृतांच्या कुटूंबियांना मदत देण्याबाबतची तरतूद नसल्याने, मृत झालेल्या मृतकांच्या कुटूंबियांना मदत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कृषी विभागाच्या गैरकारभाराचा त्रास शेतक-यांना सहन करावा लागत असल्याबाबत

**(२३) ८६८७८ (१५-०८-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील कृषी विभागाच्या गैरकारभाराचा त्रास शेतक-यांना सहन करावा लागत असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका कृषी कार्यालयाने वाडा तालुक्यातील शेतक-यांनी पीक काढून झाल्यानंतर दोन महिने उशीरा हरभरा या पिकावर कीटकनाशक फवारणी करण्यासाठी औषधे देण्यात आली आहे या प्रकरणी शासनाने त्वरीत चौकशी करुन दोषापिंतावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-१०-२०१७) :** (१) नाही.

(२) सदर किटकनाशके हरभरा पिकासाठी माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवडयात शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहेत, त्यामुळे उशीर झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीच्या मोकळया जागेवर व्यापारी संकुल उभारणेबाबत**

**(२४) ८७००० (१४-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मालकीच्या मोकळया जागेवर व्यापारी संकुल उभारणे बाबत शासन विचाराधिन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तावित व्यापारी संकुलाचा आराखडा तथा अंदाजपत्रक राज्य परिवहन विभाग बुलढाणा यांनी तयार केला आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित व्यापारी संकुलाचा आराखडा तथा अंदाजपत्रकास मंजूरी देणे बाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते (०७-११-२०१७) :** (१) नाही.

(२), (३) व (४) बुलढाणा बसस्थानकालगतच्या भूखंडामध्ये सन-२०१० मध्ये व्यापारी संकुल बांधण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत बुलढाणा येथील महामंडळाच्या भूखंडामध्ये किंवा अन्य मोकळया जागेवर व्यापारी संकूल बांधणे महामंडळाच्या विचाराधीन नाही.

---

**गोरेगाव ते दहिसर विभागासाठी सुरु करण्यात आलेल्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी स्वतंत्र जागा व पुरेशा सोयीसुविधा पुरविण्याबाबत**

**(२५) ८७०७१ (१४-०८-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव ते दहिसर विभागासाठी सुरु करण्यात आलेले उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली हे समस्यांच्या गर्तेत सापडले असल्याचे माहे एप्रिल २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर कार्यालयामध्ये दररोज सुमारे ३५०० नागरिक कामानिमित्त येतात, कार्यालयातील अपुऱ्या सोयी सुविधांमुळे त्यांची गैरसोय होत असल्याचे ही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, आता पर्यंत तब्बल ४५००० वाहनांची नोंद झाली आहे, सदर नोंदीच्या कागदपत्रांचे गठ्ठे हे कार्यालयात जागा नसल्याने पसेजमध्ये पडले असून कार्यालयामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचा अभाव असल्याने अनधिकृत वाहनांवर कारवाई करण्यात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, परिवहन कार्यालयासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध होणे व पुरेशा सोयीसुविधा पुरवणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-११-२०१७) :** (१) व (२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली या कार्यालयासाठी निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्षेत्रामध्ये सुयोग्य जागा व इमारत उपलब्ध होत नसल्याने उपलब्ध झालेल्या ३१० चौ. मी. जागेत कार्यालय सुरु करण्यात आले. परंतू, सदर कार्यालयाचे कार्यक्षेत्र हे अत्यंत दाट लोकवस्तीचे असल्याने दैंनंदिन कामकाजासाठी जागा अपूरी पडत आहे. यास्तव, सदर कार्यालयासाठी आरे आगाराची जागा भाडेतत्वावर घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) आरे आगाराची जागा भाडेतत्वावर घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा येथील बसस्थानकावर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याबाबत

**(२६) ८७१५२ (१४-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलढाणा येथील बसस्थानकावर पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने व परिसर अस्वच्छतेमुळे जिल्हाभरातील प्रवाशांची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बसस्थानकांवरील अस्वच्छतेमुळे संसर्गजन्य आजारांच्या प्रादूर्भाव होण्याची शक्यता असून प्रवाशांच्या जिविताला धोका निर्माण होत आहे, खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती प्रवाशांसाठी शुध्द व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच अस्वच्छतेमुळे प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्याच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-११-२०१७) :** (१), (२), (३) व (४) बुलडाणा येथील बसस्थानकावर खाजगी व्यक्तीकडून प्रवाशांकरिता पिण्याच्या पाण्याची स्वतंत्र पाणपोई बांधण्यात आली असून, सदर पाणपोईमधे नगरपालिकेद्‌वारे पाणी पुरवठा केला जातो. तसेच पाणपोई व बसस्थानक

परिसराची दैनंदिन स्वच्छता आगाराच्या देखरेखेखाली खाजगी संस्थेमार्फत केली जाते. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कागणी (ता.कोवाड, जि.कोल्हापूर) येथील बस थांब्याची झालेली दुरवस्था**

**(२७) ८७२३७ (२२-०८-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कागणी (ता.कोवाड, जि.कोल्हापूर) येथील बसथांब्याची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बसथांब्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नुसार सदर बसथांब्याची लवकरात लवकर दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-११-२०१७) :** (१), (२) व (३) मौजे कागणी येथे मार्ग निवारा आहे, सदरच्या मार्ग निवाऱ्याची किरकोळ दुरुस्ती व रंगरंगोटी करणे गरजेचे असल्याने, सदर मार्ग निवाऱ्याची दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम हाती घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद येथील बसस्थानकाचे सुशोभीकरण व विकास करण्याबाबत**

**(२८) ८७२९३ (१४-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद येथील म.रा.प.म च्या बसस्थानकाचे बांधकाम ४० वर्षापूर्वी झालेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बसस्थानक प्रवाश्यांसाठी अपुरे पडत आहे व त्यांची गैरसोयही होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बस स्थानकाचे सुशोभीकरण व विकास करण्यासाठी त्याचे भुमिपूजन अडिज वर्षापूर्वीच झालेले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू बस स्थानकाचे सुशोभीकरण व विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) होय.

(२) उस्मानाबाद बसस्थानक ८ फलाटांचे असून प्रवाशांसाठी प्रतिक्षालय, आसनव्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह, उपहारगृह, जनरल स्टोअर, बेकरी स्टॉल, बुकस्टॉल, चहा दुकान, पान सेंटर, रसवंतीगृह, फ्रुट स्टॉल इ. व्यवस्था आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही.

(३) होय.

(४) सदर ठिकाणी व्यापारी संकुल योजनेअंतर्गत बसस्थानकाच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली होती. तथापि, शासनाने दि.३०.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्तावास स्थगिती दिली व बसस्थानकांची पुनर्बांधणी करणे, दर्जावाढ करणे, नुतनीकरण करणे ही कामे शासनाच्या निधीतून किंवा राज्य परिवहन महामंडळाच्या निधीतून करण्याचे निर्देश दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नामपूर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील बसस्थानकात साफसफाई तसेच सोई-सुविधा देण्याबाबत**

**(२९) ८७३१० (१४-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नामपूर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथील बस स्थानक उघड्या गटारी, काटेरी बाभळी, मोकाट जनावरांचा संचार अशा अनेक समस्यांनी ग्रस्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकांची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीअंती सदर बसस्थानकात साफसफाई तसेच सोई-सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) बसस्थानक आवारातील काटेरी बाभळी काढून घेण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच, बसस्थानकावरील शौचालयाच्या परिचालन करणाऱ्या संस्थेची मुदत संपली असून, नवीन संस्थेची निवड करुन शौचालय व गटारांची दुरुस्ती करुन घेण्यात येत आहे. बसस्थानकाभोवती कायमस्वरुपी कुंपणभिंत बांधणेची बाब महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भ आणि मराठवाडयामधील बसस्थानकात भौतिक सोयी-सुविधा नसल्याबाबत**

**(३०) ८७५३९ (१४-०८-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-नागपूर राज्य महामार्गावर असलेले अर्धापूर हे बाजार आणि व्यापारपेठेचे मोठे ठिकाण असून येथून विदर्भ आणि मराठवाडयामध्ये जाणा-या प्रवाशांची संख्या लक्षणीय असूनही या बसस्थानकात भौतिक सोयी-सुविधा नसल्यामुळे प्रवाशांना गैरसोयीचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जनतेची गैरसोय टाळण्याबाबत तसेच नांदेड-नागपूर महामार्गावर जाणा-या बसेसना अर्धापूर येथे थांबा मिळण्याबाबत मा.परिवहन मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधीनी निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) व (२) नाही.

(३) नांदेड विभागांतर्गत नऊ आगारांमार्फत चालविणाऱ्या सर्व बसेसना प्रवासी चढ/उतार करण्यासाठी अर्धापूर येथे थांबा देण्यात आला आहे. विभागाच्या एकूण २७६ फेऱ्या अर्धापूर बसस्थानकावरून थांबा घेऊनच मार्गस्थ होतात.

अर्धापूर बसस्थानक हे ४ फलाटांचे असून बस्थानकात आसन व्यवस्था,प्रवाशी प्रतिक्षालय, लाईट, पंखे, उपहारगृह, तिकिट आरक्षण, चौकशी कक्ष, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, वाहनतळ, जनरल स्टोअर, केशकर्तनालय, रसवंतीगृह इ. मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे-बेंगलोर महामार्गावर मौजे आनेवाडी (जि.सातारा) व मौजे किणी (जि.कोल्हापूर) येथे बसस्थानकाची उभारणी करण्याबाबत**

**(३१) ८७५६० (१४-०८-२०१७). श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-बेंगलोर महामार्गावर मौजे आनेवाडी (जि.सातारा) व मौजे किणी (जि.कोल्हापूर) येथे बसस्थानकाची उभारणी न केल्याने प्रवाश्यांना १५ ते २० कि.मी. अंतराचे प्रवास न करतां प्रवास भाडे द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गावर एस.टी.बसस्थानकाच्या ठिकाणी थांबे देऊन त्यानुसार एस.टी.बस तिकिट आकारणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-११-२०१७) :** (१) नाही.

(२) पुणे-बेंगलोर महामार्गावर राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून मौजे आनेवाडी (जि.सातारा) व मौजे किणी (जि.कोल्हापूर) याठिकाणांवरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना टप्पा व दरपत्रकाप्रमाणे प्रवासभाडे आकारणी करण्यात येते, त्यांचेकडून कोणतेही जादा प्रवासभाडे आकारण्यात येत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात कृषी खात्यातील १० पैंकी ९ संचालकाच्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(३२) ८७६३६ (१५-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात असलेल्या १० कृषी संचालकाच्या जागांपैंकी ९ जागा रिक्त असून संचालक पदाचा प्रभारी कार्यभार एकाच संचालकांकडे देण्यांत आला असल्याचे माहे एप्रिल, २०१७ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती कृषी खात्याचा कारभार सुरळीत चालावा म्हणून कृषी संचालकांची रिक्त पदे पूर्णक्षमतेने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-११-२०१७) :**(१), (२) व (३) कृषि विभागाच्या मंजूर आकृतिबंधानूसार मूळ विभागामध्ये संचालकांचे ५ पदे मंजूर असून प्रतिनियुक्तीची ४ पदे मंजूर आहेत. प्रतिनियुक्तीचे १ पद यापूर्वीच भरलेले असून दिनांक ०५/०६/२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये ४ अधिकाऱ्यांना संचालक, गट-अ पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. उर्वरीत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयातील कुर्डूवाडी येथील पंढरपूरी म्हैस या प्रजातीवर संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत**

**(३३) ८८०४० (२१-०८-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील कुर्डूवाडी येथील नॅशलन डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाने पंढरपूरी म्हैस या प्रजातीवर संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी दोन कोटी रुपयांची मदत देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली हे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती पंढरपूरी म्हैस या प्रजातीवर संशोधन केंद्र स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०४-१२-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) कुर्डुवाडी येथे प्रक्षेत्र स्थापन केल्यास प्रक्षेत्रावर वैरण उत्पादनासाठी तसेच दैनंदिन कामकाजासाठी लागणारे पाणी व कुर्डुवाडी येथील पाण्याच्या उपलब्धतेचा विचार करता, दि.२६.९.२०१७ रोजी मा.मंत्री (पदुम) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत कुर्डुवाडी ऐवजी भांडारकवठे, जि.सोलापूर येथे महाराष्ट्र पशुधन विकास मंडळांतर्गत पंढरपूरी म्हैस प्रजाती संशोधन केंद्र स्थापन करण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत केंद्राकडून आलेला निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(३४) ८८३९६ (१५-०८-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत केंद्राकडून आलेला निधी कृषी विभागासह इतर १० विभागांना वाटला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, २०१६-१७ या आर्थिक वर्षात कृषी विभागाला २०५ कोटी रुपये मंजुर होवून प्रत्यक्षात १३१ कोटी रुपये खर्च झाल्याची बाब मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अखर्चित निधी राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-११-२०१७) :** (१) होय.
(२), (३) नाही, तथापि सन २०१६-१७ करीता राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत एकुण रु.४१८.१८ कोटी निधी प्राप्त झाला असून, सदर निधीपैकी एकुण रु. २१५ कोटी निधीचे माहे मार्च, २०१७ अखेर पर्यंत उपयोगीता प्रमाणपत्र केंद्र शासनास पाठविले असुन, उर्वरीत अखर्चीत निधी चालु वर्षी खर्ची टाकण्यास केंद्र शासनाने दि.०३.११.२०१७ अन्वये मान्यता दिलेली आहे.
(४) केंद्र शासनाकडून दुसऱ्या हफ्त्यातील निधी माहे फेब्रुवारी व मार्च, २०१७ मध्ये प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा डोंगरगाव (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील पुनर्वसन वसाहतीला नागरी सुविधा उपलब्ध होणेबाबत**

**(३५) ८८५१० (१५-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा डोंगरगाव (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) येथील पुनर्वसन वसाहतीतील नागरी सुविधा करीता वाढीव निधीची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्वसित क्षेत्रातील नागरीसुविधांच्या आभावाने नागरिकांनी त्या ठिकाणी आपली घरे बांधली नसल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास मौजा डोंगरगाव येथील पुनर्वसित वसाहतीत आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध होणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-११-२०१७) :** (१) आढळून येत नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) मौजा डोंगरगाव, (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) या गावाचे मौजा नारायणपूर, (ता.समुद्रपूर) येथे एकूण ८.६४ हे.आर. जमीन संपादित करुन, पुनर्वसन करण्यात आले. नवीन पुनर्वसित जागेमध्ये रस्ते, नाल्या,शाळेची इमारत, अंगणवाडी, कोंडवाडा, समाज मंदिर, पाणी पुरवठा योजनेची टाकी इत्यादी नागरी सुविधांची कामे पूर्ण करण्यात आलेली असून सन २०११-१२ मध्ये सदर योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या कृषि विभागाचे साडेनऊ हजार कर्मचारी आणि अधिकारी जलसंधारण विभागाकडे वर्ग केल्याबाबत**

**(३६) ८८५८७ (१५-०८-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या कृषि विभागाचे साडेनऊ हजार कर्मचारी आणि अधिकारी जलसंधारण विभागाकडे वर्ग करण्यास मा.कृषि मंत्री यांनी विरोध दर्शविला असून सदरचा निर्णय रद्द करण्याची मागणी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०९ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, काय हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-११-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.
या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांचे निर्देशानुसार दोन्हीही विभागांच्या सचिवांनी पूर्वचर्चा करुन सुवर्णमध्य साधण्याबाबतचे आदेश दिले.
(२) मृद व जलसंधारण विभागाने दिनांक ३१/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृषि विभागाची ९९६७ पदांची मागणी केली आहे. त्या अनुषंगाने कृषि विभागाच्या दिनांक

१२/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये कृषि विभागाची एकूण २१८१ पदे मृद व जलसंधारण विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहेत. इतर विषयांबाबत चर्चा/बैठका चालू आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात शासनाने कृषी कार्यालयासाठी निश्चित केलेली रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३७) ८८९७२ (१५-०८-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात शासनाने कृषी कार्यालयासाठी निश्चित केलेल्या मंडळ कृषी अधिका-यांची २ पदे, कृषी सहाय्यकाची १९ पदे, अनुरेखक ४ पदे, वरिष्ठ लिपिक १, कनिष्ठ लिपिक ३, शिपाई ३, शिपाई ५ अशी रिक्त पदे असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्त पदांमुळे येथे अनेक कृषी विषयक कामे संथगतीने सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२८-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

तालुका कृषी अधिकारी मंगळवेढा जि.सोलापूर अंतर्गत मंडळ कृषी अधिकाऱ्यांची २ पदे, कृषी पर्यवेक्षकांची २ पदे, कृषी सहाय्यकांची २४ पदे, अनुरेखकांची ५ पदे व कनिष्ठ लिपीकांची ३ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

रिक्त असलेल्या मुख्यालयांचा व पदांचा अतिरिक्त पदभार इतर अधिकारी/कृषि सहाय्यकांकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाच्या कृषी विषयक योजना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यात येत आहेत.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील ५० पदांची शिफारस शासनास सादर केली असून शिफारसपात्र उमेदवारांना दि.१० नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार नियुक्तीपत्रे देण्यात आलेली आहेत. त्याव्यतिरिक्त गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील सरळसेवेच्या ७९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले आहे. गट-ब कनिष्ठ संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील १०२ पदांवर पदोन्नतीद्वारे पदस्थापना देण्याची कार्यवाही सुरु आहे.

कृषि सहाय्यक संवर्गातील आदिवासी क्षेत्रातील रिक्त पदांचा आढावा घेवून प्रचलित शासन नियमानुसार पदभरतीची कार्यवाही विभागीय कृषी सहसंचालक स्तरावर सुरु करण्यास सूचित केलेले आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दि. २५.०५.२०१७ अन्वये प्रशासकीय विभाग आकृतिबंध अंतिम मंजूर करुन घेणार नाहीत, तोपर्यत त्या विभागांना नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही. विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध अंतीम करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतिबंध अंतीम झाल्यानंतर गट-क मधील कृषि आयुक्तालयातील तसेच अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील लिपिक, वरिष्ठ लिपिक, सहा. अधिक्षक, अनुरेखक, वाहनचालक व लघुटंकलेखक, लघुलेखक(निम्नश्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या संवर्गाची पदे निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील पेवा, बाळापूर व शेंवाळ पिंपरी या गावाला जाणाऱ्या बसमधील वाहक पैसे देवूनही प्रवाशांना तिकीट देत नसल्याबाबत**

**(३८) ८९०१८ (१४-०८-२०१७). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील हदगाव आगारातून निबधा मार्गावरील पेवा, बाळापूर शेंवाळ पिंपरी या गावाला जाणा-या बसमधील वाहक पैसे देवूनही प्रवाशांना तिकीट देत नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर मार्गावरील बसेस मध्ये अपहार करणा-या वाहक व चालक यांच्यावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-११-२०१७) :** (१) होय.

(२) राज्य परिवहन महामंडळाच्या मार्गतपासणी पथकाद्वारे माहे मे, २०१७ मध्ये तपासणी करुन सदर मार्गावरील बसमधील प्रवाशांना पैसे देऊनही तिकीट देत नसलेल्या वाहकांवर आरोपपत्रे दाखल करुन अंतिम आदेशानुसार एका वाहकाच्या दोन वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केल्या आहेत. दुसरा वाहक रोजंदारी कर्मचारी असल्याने त्यास रु.२०,०००/- दंड करुन सेवेतून काढून टाकले आहे, तिसऱ्याची वार्षिक वेतनवाढ एक वर्षासाठी तात्पुरती बंद केली आहे. तसेच चौथ्या वाहकाविरुध्द शिस्त व आवेदन कार्यपध्दती सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एरंडोल (जि.जळगांव) येथील बसआगार, बसस्थानक व परिसरातील विविध समस्या सोडविण्याबाबत**

**(३९) ८९२७१ (१४-०८-२०१७). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल (जि.जळगांव) येथील बसआगार, बसस्थानक व परिसरातील विविध समस्येबाबत स्थानिक नागरीकांच्या तक्रारीनुसार दिनांक २ मे, २०१७ रोजी तालुक्याची समन्वय समितीची सभा घेऊन आगार प्रमुखांना समस्या सोडविण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी निर्देश दिलेले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर कामात दुर्लक्ष करणाऱ्या आगार प्रमुख, एरंडोल यांच्यावर कारवाई तसेच एरंडोल (जि.जळगांव) येथील बसआगार, बसस्थानक व परिसरातील विविध समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१८-११-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे तातडीने आगार व बसस्थानक परिसरातील झाडे, झुडपे काढून परिसर स्वच्छ व मोकळा करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे बसस्थानक व आगार परिसराची दैनंदीन स्वच्छता सफाई कामगारांमार्फत दररोज करुन घेण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळात चालक पदावर कार्यरत असणाऱ्या पित्याच्या मृत्यूपश्चात त्यांचा पाल्यास सेवेत दाखल करणेबाबत**

**(४०) ९००८० (१४-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः मराठवाडा प्रादेशिक विभागातील हिंगोली जिल्हास्थित राज्य परिवहन महामंडळात चालक पदावर कार्यरत असताना प्रदीर्घ आजारामुळे स्वर्गवासी झालेल्या पित्याच्या मृत्यूपश्चात त्यांचा पाल्य श्री.सागर राजेंद्र राउत या सुशिक्षित बेरोजगार व अर्हताकारी प्राप्त उमेदवारास विशेष अनुकंपा भूमिकेतील दिनांक २९ सप्टेंबर, २००१ ची अट शिथिल करून विशेषबाब तत्वावर राज्य परिवहन महामंडळाच्या हिंगोली जिल्हा आगारात सेवा दाखल करण्याबाबत तसेच वडिलांच्या मृत्यूपश्चातील प्रदेय धनराशी तातडीने प्रत्यार्पित करण्याबरोबरच मागणी स्थानीय रापम पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, जनप्रतिनिधी यांनी माहे जून, २०१७ वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (परिवहन), मा.राज्यमंत्री (परिवहन) व मुख्य सचिव (साप्रवि) आणि अप्पर मुख्य सचिव (गृह तथा वाहतूक) आणि औरंगाबाद महसुली विभागाचे विभागीय आयुक्त आणि विभागीय राज्य परिवहन प्राधिकारी (औरंगाबाद विभाग), विभाग नियंत्रक (हिंगोली) यांच्याकडे माहे १७ एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-११-२०१७) :** (१) राज्य परिवहन महामंडळास श्री. सागर राऊत यांचे दिनांक ०८.०१.२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले आहे. परंतू, त्यांचे दिनांक १७.०४.२०१७ रोजीचे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(२) राज्य परिवहन महामंडळाच्या दि.१६.०२.१९९४ च्या परिपत्रकान्वये महामंडळाच्या सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्याचा प्रत्यक्ष कामगिरीवर नसताना मृत्यू झाल्यास अनुकंपा लागू होण्यासाठी उक्त कर्मचाऱ्याची महामंडळामध्ये किमान ५ वर्षे सेवा झालेली असावी अशी अट होती. श्री.सागर राजेंद्र राऊत यांच्या वडीलांचे निधन कामगिरीवर नसताना, दिनांक २१.०१.२००१ रोजी झालेले आहे. तसेच, त्यांची सेवा ५ वर्षापेक्षा कमी आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकरणास अनुकंपा लागू होत नाही.

सद्यस्थितीत, राज्य परिवहन महामंडळाद्वारे दि.०७.०२.२००५ च्या परिपत्रकांन्वये दि.२१.०९.२००१ च्या पुढील प्रकरणांसाठी सदरची अट रद्द करण्यात आली आहे.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे श्री. राजेंद्र वामन राऊत (चालक) यांच्या वारसास अंतिम देयक रक्कम रु.५,९३७/- अदा करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास २६७ कोटी रुपयांचा झालेला तोटा

**(४१) ९०१२६ (१४-०८-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे प्रवासी उत्पन्न सुमारे २६७ कोटी रुपयांनी कमी झालेले असून एस.टी.महामंडळाची आर्थिक स्थिती खालावलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास,एस.टी. महामंडळाचे उत्पन्न वाढावे व ते आर्थिकदृष्टया सक्षम व्हावे, यासाठी कोणते विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत वा येत आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-११-२०१७) :** (१) सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ च्या अलेखापरिक्षित लेख्यांप्रमाणे रु.२२८.२६ कोटी घट झाली आहे. सदर अलेखापरिक्षित लेख्यांची नोंद अद्याप महामंडळात घेतलेली नाही.
(२) राज्यामध्ये अवैध व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या संख्येत झालेली वाढ, एस.टी. व्यतिरिक्त अन्य वाहनांच्या माध्यमातून प्रवासी प्रवास करीत असल्याने त्याचा परिणाम राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर होत आहे, डिझेल व इतर भांडार सामानाच्या किंमतीत सतत होणारी वाढ, दर सहा महिन्यात कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात

होणारी वाढ, इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात महामंडळावर असलेले जास्त कराचे प्रमाण, वेळोवळी उद्भवणारी दुष्काळ सदृष्य परिस्थिती, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी व इतर अन्य बाबींमुळे राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नात घट होत आहे.

(३) राज्य परिवहन महामंडळाचा तोटा कमी करण्यासाठी पुढील प्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

१. भाडे तत्त्वावर वातानूकुलीत बसेस घेण्याचे योजिले आहे.

२. भारमान पातळीत किमान २ अंकानी वाढ करुन ७१.६० अंकाचे उद्दीष्ट.

३. शेतकरी बांधवांना त्यांच्या शेतीमालास मुबलक अशी जागा असणाऱ्या नवीन बसेसची संख्या वाढविण्यात येत आहे.

४. ग्रामीण भागामध्ये ७० पेक्षा कमी भारमान असणाऱ्या नियतांवर मिडी बस चालविण्याचे नियोजन.

५. राज्य भरात सद्या अस्तित्वात असलेल्या ४१ बस स्थानकांचे कायापालट तसेच पुनर्बांधणी करण्याकरीता ३० आर्किटेक्ट यांची नेमणूक करणे.

६. १०० मालवाहतूक ट्रक नव्याने चालनात आणण्याचे प्रस्तावित आहे.

७. राज्य परिवहन प्रवासी व उत्पन्नात वाढ होण्याकरीता राज्य परिवहन महामंडळामध्ये दि.०१.०१.२०१७ ते दि.३१.०३.२०१७ पर्यंत प्रवासी वाढवा विशेष अभियान राबविण्यात आले.

८. प्रवाशांना राज्य परिवहन बसेसच्या वेळापत्रकाची माहिती मिळण्याकरीता मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहेत.

९. राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये वाय-फाय सुविधा, प्रवाशांच्या माहितीकरीता बसस्थानकांवर व्ही.टी.एस./पी.आय.एस. द्वारे माहिती दिली जाणार.

१०. राज्य परिवहन महामंडळातील वेळापत्रक तसेच इतर अडचणी सोडविण्याकरीता कॉल सेंटर अमलात आणण्यात येणार.

११. राज्य परिवहन सवलतप्राप्त प्रवाशांकरीता स्मार्ट कार्ड देण्यात येणार.

१२. पेटीएम व अन्य तीन संस्थांना ई-व्हॉलेट व पेमेंट गेटवे बाबत नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच आरक्षण केंद्रामध्ये स्वाईप मशिनद्वारे तिकीट आरक्षणाची सुविधा करणे.

१३. दिवाळी हंगाम व इतर सनांच्या कालावधीत लवचीक भाडे आकारणी करुन सन २०१६ च्या दिवाळी हंगामात रु.२८ कोटीचे अतिरिक्त उत्पन्न.

१४. विना वाहक व शटल फेऱ्यांमध्ये वाढ करण्यात आली असून, प्रवाशांना मुबलक सेवा पुरविणे शक्य झाले आहे.

१५. संगणीकृत चालक, वाहक कामगिरी व बसेसचे चालन करण्यात येवून उत्पादकतेत वाढ करणे.

---

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे खाजगीकरण करण्याबाबत**

**(४२) ९०१४२ (१४-०८-२०१७). श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रसरकाने देशभरातील खासगी भागीदारीतून प्रवासी वाहतूक सुरु करण्याचा निर्णय घेतल्यामुळे देशभरातील २७ राज्यपरिवहन महामंडळ मोडीत काढणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रराज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटीला) टाटा कन्सलटन्सी आणि रिलायन्स या कंपन्यांकडे सोपविण्यात येणार असल्याचे माहिती माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, एसटी महामंडळाचे खाजगीकरण करण्याबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करुन त्यानुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-११-२०१७) :** (१) व (२) हे खरे नाही.

तथापि, दिनांक १४.०४.२०१७ रोजीच्या दैनिक "पुढारी" या वर्तमानपत्रामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिध्द झाले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जालना शहराजवळ सीड पार्क उभारणीबाबत

**(४३) ९०६१० (१५-०८-२०१७). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जालना शहराजवळ सीड पार्क उभारणीची घोषणा करुन सहा महिने झालेले असून नियोजीत सीड पार्कची तीस हेक्टर जमीन अद्याप एमआयडीसी कडे हस्तांतरीत करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती सीड पार्कची तीस हेक्टर जमीन एमआयडीसी कडे हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०७-१०-२०१७) :** (१), (२) व (३) जालना येथे सीड पार्क उभारण्याकरीता मौ. पानशेंद्रा जि.जालना येथील ६०.६९ हेक्टर जमीनीच्या हस्तांतरणाचा प्रस्ताव शासन स्तरावर मंजूरीस्तव सादर करण्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविण्यात आले असून सदरचा प्रस्ताव प्रतिक्षेत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील लोहा बसस्थानकांची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

**(४४) ९११३६ (१४-०८-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील लोहा शहर हे नागपूर-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील मोठे ठिकाण असून या मार्गावर असलेल्या लोहा बसस्थानकांची अत्यंत दुरवस्था झाल्याचे नुकतेच माहे मे,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बसस्थानकातून ७०० बसेस दररोज धावत असतांनाही याठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे, अतिक्रमणाने विळखा घातलेला असून जनावरांसह कुत्र्यांचा सुळसुळाट, शौचालय नाही पाकीटमारांसह इतर चो-या आदि सुविधांअभावी लोहा बसस्थानकाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १० वर्षापासून बीओटी तत्वावर बसस्थानकासह व्यापारी गाळयाची भव्य इमारत बांधण्यात आलेली असून हे बसस्थानकामध्ये सुविधा नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बसस्थानकाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, पाहणीअंती जबाबदार असणा-या अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-११-२०१७) :** (१), (२) व (३) नाही.

(४) राज्य परिवहन महामंडळाच्या लोहा बसस्थानकावर प्रवाशांसाठी प्रसाधनगृह, पार्सल कक्ष, बसण्यासाठी स्टीलची बँचेंस, पिण्याच्या पाणी, वाणिज्य आस्थापना, उपहारगृह, वाहतूक नियंत्रण कक्ष इ. मुलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच, बसस्थानकातील प्रसाधनगृह व स्थानक परिसराची स्वच्छता करण्यात येत आहे.

सदर बसस्थानकामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी महामंडळाद्वारे दि.०१.०४.२०१७ पासून ५ सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उन्नत शेती समृध्द शेतकरी अभियानाची अंमलबजावणी होण्याबाबत

**(४५) ९१३५१ (१५-०८-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), अॅड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०२२ पर्यंत राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी राज्य शासनाने जाहिर केलेल्या उन्नत शेती, समृध्द शेतकरी अभियानाची सुरुवात दिनांक २५ मे, २०१७ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे काय आहेत,

(३) असल्यास, सदर निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी कृषी सहायक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी आणि तालुका कृषी अधिकारी यांच्या बदल्या न करण्याचा

निर्णय शासनाने घेतला असल्याने कर्मचारी व अधिकारी यांच्यामध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कृषी खात्यात कर्मचारी अधिकाऱ्यांच्या मोठ्याप्रमाणात जागा रिक्त असल्याने अभियानाची अंमलबजावणी करताना अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन अभियानाची अंमलबजावणी योग्यप्रकरे होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१७-११-२०१७) :** (१) होय.
(२) यात राज्यात प्रत्येक कृषि सहायकांकडे प्रत्येक उद्दिष्ट पिकांकरिता १ प्रात्याक्षिक व गट समूह स्वतंत्रपणे उद्दीष्ट देणे व त्या प्रात्याक्षिक क्षेत्रावर कृषि विभागाचे विस्तार अधिकारी व कृषि विद्यापीठाचे तज्ञ, प्रगतशील सन्मान प्राप्त शेतकऱ्यांच्या मार्गदर्शना खाली प्रमुख पिकांची उत्पादकता त्यांच्या अनुवंशिक उत्पादन क्षमतेपर्यंत वाढविण्याचा प्रयत्न करणे याकरिता कृषि अभियान, सुक्ष्म सिंचन इ. योजनेचा लाभ या प्रात्यक्षिक वर भरीव स्वरुपात देणे, पिक विमा योजनेंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करुन घेऊन नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानी पासून शेतकऱ्यांना संरक्षित करणे ही उन्नत शेती, समृद्ध शेतकरी अभियानाची प्रमुख उद्दीष्टये आहेत.
(३) नाही, खरीप हंगामात तंत्रज्ञान हस्तांतरण (Transfer of Technology) च्या कालावधीत बदल्यांचा सत्र चालु ठेवल्यास सदर कार्यक्रमावर दुष्पपरिणाम होणार याचा विचार करुन या कालवधीत बदल्या न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे या कारणावरुन असंतोष निर्माण होणे संयुक्तिक कारण नाही.
(४) सदर कार्यक्रम कृषि सहायकांच्या भरलेल्या पदापूरती मर्यादित ठेवल्यामुळे प्रश्न उदभवत नाही.
(५) उन्नत शेती-समृद्ध शेतकरी अभियानांतर्गत दि.२५ मे ते ८ जून, २०१७ या रोहिणी नक्षत्राच्या कालावधीत कृषि व कृषि संलग्न विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी गावोगावी जाऊन आधुनिक तंत्रज्ञान व योजनांची माहिती शेतकऱ्यांना देऊन खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर त्यांना मार्गदर्शन केले तसेच प्रत्येक गावात खरीप हंगामपूर्व तयारी बैठकांचे आयोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे, यांत्रिकीकरणाचे अभियान प्रत्येक गावात १ हेक्टर क्षेत्रावर पिक प्रात्यक्षिकांव्दारे तंत्रज्ञान प्रसार, शेतकऱ्यांची प्रशिक्षणे, सुक्ष्म सिंचन, फलोत्पादन इ. बाबींची खरीप व रब्बी हंगामात अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दहिवाडी (जि.सातारा) बसस्थानकात मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(४६) ९१७६३ (१४-०८-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिवाडी (जि.सातारा) बस स्थानकात गेली चार वर्षे बांधलेली सुसज्ज इमारत वापराविना पडली असल्यामुळे प्रवाशांची मोठयाप्रमाणात गैरसोय झाली असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती बसस्थानकात मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत व ते सुस्थितीत सुरु करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-११-२०१७) :** (१), (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या दहिवडी बसस्थानकाची इमारत सन १९७७-७८ साली बांधण्यात आलेली असून, सदर इमारत सुस्थितीत आहे.

सदर बसस्थानकामध्ये सन-२०१४ साली महिलांसाठी मा.खासदारांच्या स्थानिक विकास निधीतून स्वतंत्र शौचालय बांधण्यात आले आहे. सदरचे शौचालय वापरात आणण्यासाठी 'फॅसिलिटी मॅनेजमेंट सर्विसच्या माध्यमातून मे.ब्रिक्स इंडिया प्रा.लि.या एजन्सीला कार्यादेश देण्यात आला आहे. निविदा प्रपत्रामधील कालमर्यादेत स्वच्छतागृहांच्या साफसफाईचे काम केले जाणार आहे.

सद्यस्थितीत बसस्थानकामध्ये पिण्याचे पाणी, लाईट, शौचालय इ. सुविधा उपलब्ध असून, बसस्थानकाचे डांबरीकरण सुस्थितीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्हयात कृषी विभागाने राष्ट्रीय फलोत्पादन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना शेडनेट बांधून देण्याबाबत

**(४७) ९१७९६ (१५-०८-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात कृषी विभागाने राष्ट्रीय फलोत्पादन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना शेडनेट बांधून दिले हे खरे आहे काय
(२) जिल्हयातील तापमानाचा अभ्यास न करता शेडनेटचे बांधकाम करण्यात आले परंतु उन्हाळ्यात शेडनेट कोणतेही पिक घेता येत नही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांनी शेडनेट करिता घेतलेल्या कर्जाची परतफेड केली नाही त्यामुळे कर्जात वाढ झाली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जिह्यात योजना यशस्वी नसतांनाही योजनेचा लक्ष पूर्ण करण्यासाठी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबतची चौकशी करुन शासनाने अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१३-११-२०१७) :**(१) हे खरे नाही. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजना या योजनेंतर्गत शेडनेट हाऊस उभारण्यासाठी लक्षांकाच्या अधिन राहून पूर्वसंमती देण्यात येते. पूर्वसंमतीनंतर लाभार्थी त्यांच्या पसंतीनुसार उत्पादक/वितरकाकडून शेडनेटचे बांधकाम करुन घेतात. कृषि विभागाकडून शेडनेट बांधून देण्यात येत नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशी तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजने अंतर्गत विलंबाने प्रस्ताव सादर करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(४८) ९१८०७ (१५-०८-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजने अंतर्गत अपघातग्रस्त शेतक-याला विम्याची रक्कम मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी मंडळ कृषी अधिकारी तसेच कृषी पर्यवेक्षक यांची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरजगाव बंड, (ता.चांदूरबाजार, जि.अमरावती) येथील दीपक गुलाबराव कोठेकर या शेतक-याचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर ७९ दिवस विलंबाने प्रस्ताव दाखल झाल्यामुळे या शेतक-याच्या कुटुंबाला रक्कम नाकारण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या शेतक-याला विम्याची रक्कम देण्यात यावी तसेच विलंबाने प्रस्ताव सादर करणा-यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१४-११-२०१७) :** (१) योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार क्षेत्रिय स्तरावरील सर्व कृषि पर्यवेक्षक यांना दावा / प्रस्ताव सादरकर्ता प्राधिकारी म्हणून घोषित केलेले आहे.

(२) होय, हे अंशतः खरे आहे.

नॅशनल इंशुरंस कंपनीने हा प्रस्ताव ९० दिवसांची मुदत संपल्यानंतर प्राप्त झालेला असल्याने परत केला आहे. मात्र शासन निर्णय दि.२६.११.२०१५ नुसार प्रस्ताव विहित मुदतीत सादर केले नाहीत या कारणास्तव विमा कंपनीला विमा प्रस्ताव नाकारता येणार नाहीत. सबब सदरचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पुन्हा नॅशनल इंशुरन्स कंपनीकडे मंजुरीसाठी सादर केला आहे.

(३) शेतकऱ्याला विम्याची रककम देण्यात यावी, तसेच विलंबाने प्रस्ताव सादर करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तालुका कृषि अधिकारी, चांदूर बाजार यांचेकडे केलेली नाही, असे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिताफळ, आंबा, आवळा, लिंबू, पपई या फळांकरिताही पीक विमा योजना लागू करण्याच्या प्रस्तावाबाबत

**(४९) ९२१७३ (१५-०८-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने संत्रे, मोसंबी, डाळिंब, पेरु, चिकू या पाच फळांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना लागू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच धर्तीवर सिताफळ, आंबा, आवळा, लिंबू, पपई या फळांकरिताही पीक विमा योजना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिताफळ, आंबा, आवळा, लिंबू, पपई या फळांकरिताही पीक विमा योजना लागू करण्याचा प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१५-११-२०१७) :** (१) होय.
(२) हवामान आधारीत पीक विमा योजनेतंर्गत आंबिया बहारात आंबा व लिंबू या फळांचा समावेश केलेला आहे. तथापि, सिताफळ, आवळा व पपई या फळांचा फळ पीक विमा योजनेमध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव अद्याप विचाराधीन नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी एकछत्र योजना लागू करण्याबाबत

**(५०) ९२४३८ (०४-०९-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोतवाल, पोलीस पाटील, आशा वर्कर्स व अंगणवाडी सेविका या व अशा मानधन असलेल्या कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी दिनांक १८ मार्च २०१७ रोजी वा त्यासुमारास च्या शासन निर्णयान्वये एकछत्र योजना तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकछत्र योजनेचे स्वरूप काय आहे व सदर योजनेसाठी नेमलेल्या समितीने दिलेल्या शिफारशीनुसार शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०२-१२-२०१७) :** (१) व (२) राज्यातील कोतवालांप्रमाणे “पोलीस पाटील”, “आशा वर्कर्स” व “अंगणवाडी सेविका” या व अशा मानधनावर असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी “एकछत्र योजना” तयार करण्याकामी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक १८ मार्च, २०१७ अन्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.